“शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना”
राबविणेबाबत मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- आयटीआय-२०२३/प्र.क्र.९४/व्यशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ फेब्रुवारी, २०२४

वाचा :-
१. शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ चा अधिनियम क्र. ५२
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ दिनांक ०९.०२.२०१८ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ (अधिसूचना)
३. दि.०५.०४.२०१८
कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार अधिसूचना, नवी दिल्ली, दिनांक - २५.०९.२०१९
४. Govt. of India, Ministry of Skill Develop. & Entrepreneurship, Letter No. F.No. MSDE-०१/०१/२०१८-AP(PMU) Dated १५th November, २०१९
५. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र.१२७/व्यशि-३ दिनांक ३.०६.२०२१
६. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. राशिउ-२०२२/प्र.क्र.६४/व्यशि-३ दिनांक ०२.०८.२०२२
७. केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.MSDE-१४(०१)/२०२२-AP Dated-०७.१०.२०२२
८. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन पूरकपत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. २०.०३.२०२३
९. National Skill Development Corp. यांचे दिनांक १२.०७.२०२३ चे पत्र

**प्रस्तावना:-**

कुशल कारागिरास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी आधुनिक यंत्रसामुग्री व आधुनिक तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन हा कुशल कारागीर सर्व दृष्टीने स्वावलंबी बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना अस्तित्वात आली.

२. औद्योगिक आस्थापनांमध्ये उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग करुन कुशल कारागिरास आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ अन्वये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजवणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी कायदा, २०१८ अस्तित्वात आलेला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ असाधारण क्रमांक २२ दिनांक ०९/०२/२०१८ व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ (अधिसूचना) दिनांक ०५/०४/२०१८ नुसार सर्व औद्योगिक आस्थापनांना त्यांच्याकडील मनुष्यबळाच्या २५% शिकाऊ उमेदवार प्राधान्याने भरती करण्यांचे आवाहन करण्यात आले आहे.

३. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे पत्र क्रमांक :-File No. MSDE-०१(०१)/२०१८-AP (PMU) New Delhi, dated ०१/१०/२०१९ अन्वये ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ३० किंवा त्यापेक्षा जास्त मनुष्यबळ आहे, त्या आस्थापणेने वित्तीय वर्षात शिकाऊ उमेदवारी भरती २.५% ते १५% ( महाराष्ट्रा राज्यासाठी मर्यादा-२५% ) पर्यंत करणे बंधनकारक आहे. शिकाऊ उमेदवारी भरती करताना किमान ५% जागा फ्रेशर व कौशल्य प्रमाणपत्र धारक उमेदवारांसाठी आरक्षित ठेवण्यात याव्यात. ज्या आस्थापनेत (कंत्राटी कामगारांसहीत) ४ ते २९ पर्यंत मनुष्यबळ आहे, त्या आस्थापने शिकाऊ उमेदवारी भरती करणे बंधनकारक नाही. परंतु, त्याही आस्थापना आवश्यक असल्यास शिकाऊ उमेदवारी भरती करु शकतात. तीन किंवा त्यापेक्षा कमी मनुष्यबळ असलेल्या आस्थापनेला शिकाऊ उमेदवारी भरती करण्यास मान्यता नाही.

४. महाराष्ट्रात शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेचे काम पहाण्यासाठी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांना "राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार" म्हणून नेमले आहे. तसेच सहा विभागीय कार्यालयांच्या प्रमुखांना "सहप्रशिक्षणार्थी सल्लागार (वरिष्ठ)" या पदाचा दर्जा दिलेला आहे. ते त्यांच्या अधिपत्याखालील शासकीय/अशासकीय आस्थापनेतील निर्देशित व्यवसायांच्या (Designated Trade) शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गतची कामे पाहतात.

५. महाराष्ट्र राज्यात निर्देशित व्यवसायांच्या शिकाऊ उमेदवारीकरीता खालील ४५ मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रे (BTRI) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. सदर प्रशिक्षण सूचना केंद्रांविषयी अधिकची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर केंद्रातील सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार व कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार यांची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक यादी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

| अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र | अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र | अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ETHS मुंबई-१ | १६ | नाशिक | नाशिक | ३१ | परभणी | परभणी |
| २ | मुंबई शहर | मुंबई - ११ | १७ | धुळे | धुळे | ३२ | बीड | बीड |
| ३ | मुंबई शहर | दादर | १८ | जळगांव | जळगांव | ३३ | नांदेड | नांदेड |
| ४ | मुंबई उपनगर | विलेपार्ले | १९ | अहमदनगर | अहमदनगर | ३४ | उस्मानाबाद | उस्मानाबाद |
| ५ | मुंबई उपनगर | खार | २० | कोपरगांव | अहमदनगर | ३५ | लातूर | लातूर |
| ६ | ठाणे | वागळे इस्टेट, ठाणे | २१ | पुणे | औंध पुणे | ३६ | लातूर | निलंगा |
| ७ | ठाणे | कोपरी कॉलनी, GTHS ठाणे | २२ | पुणे | घोले रोड, GTHS पुणे | ३७ | बुलढाणा | खामगांव |
| ८ | ठाणे | अंबरनाथ | २३ | पुणे | पिंपरी-चिंचवड | ३८ | अकोला | अकोला |
| ९ | ठाणे | उल्हासनगर | २४ | सातारा | सातारा | ३९ | अमरावती | अमरावती |
| १० | पालघर | वाणगांव | २५ | सातारा | कराड | ४० | यवतमाळ | यवतमाळ |
| ११ | रायगड | पनवेल | २६ | सांगली | सांगली | ४१ | वर्धा | वर्धा |
| १२ | रायगड | महाड | २७ | सोलापूर | सोलापूर | ४२ | नागपूर | नागपूर |
| १३ | रत्नागिरी | रत्नागिरी | २८ | कोल्हापूर | कोल्हापूर | ४३ | भंडारा | भंडारा |

| अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र | अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र | अ. क्र. | जिल्हा | मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | रत्नागिरी | चिपळूण | २९ | औरंगाबाद | औरंगाबाद | ४४ | गोंदिया | गोंदिया |
| १५ | सिंधुदुर्ग | सावंतवाडी | ३० | जालना | जालना | ४५ | चंद्रपूर | चंद्रपूर |

६. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेस प्रोत्साहन मिळण्यासाठी राज्यात दोन योजना राबविण्यांत येतात.

६.१ **राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना** (National Apprenticeship Promotion Scheme - NAPS)

केंद्र शासनाची National Apprenticeship Promotion Scheme - NAPS ही योजना दिनांक १९/०८/२०१६ पासून शिकाऊ उमेदवारांच्या भरतीकरीता प्रोत्साहन देण्यासाठी सुरु करण्यात आली आहे. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यासाठी आस्थापनांना दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या २५% किंवा रु. १५००/- यापैकी कमी असलेली रक्कम आस्थापनेला देय आहे. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (NAPS) अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

संदर्भ क्र. ७ नुसार दिनांक ०१.०४.२०२२ पासून थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने (DBT व्दारे) विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांच्या खात्यात जमा होते.

संदर्भ क्र. ८ नुसार राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत (NAPS) अंतर्गत निधी केंद्र व राज्य शासनाच्या विभागांना तसेच सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांना उपलब्ध होणार नाही. या आस्थापनांसाठी दिनांक ०१.०७.२०२३ च्या नंतरचे नवीन करार Non DBT असतील, म्हणजेच आस्थापना शिकाऊ उमेदवारांना पूर्ण विद्यावेतन देतील.

६.२ **महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना** (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme - MAPS)

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी "महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)" दिनांक ०३.०६.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये ५,०००/- यापैकी कमी असलेले अतिरिक्त विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारी विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या ७५% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे शासन पुरकपत्र क्र. आयटीआय-२०२०/प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. २०.०३.२०२३ (संदर्भ क्र. ८) सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात प्रलंबित विद्या वेतन हे ऑफलाईन पद्धतीने वितरित करण्यास मान्यता देण्यात आलेली असून दिनांक ०१.०४.२०२३ पासून ऑनलाईन पध्दतीने MahaDBT मार्फत विद्यावेतन देण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

देय विद्यावेतनाच्या व्यतिरिक्त अतिरिक्त स्वरुपात महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंव्दारे विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना देण्यात येत आहे.

७. शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी शासकीय कार्यालयात करणेबाबत शासन स्तरावर सातत्याने विचारणा होत असते. त्याअनुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सूचना प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत उमेदवारांना ६ ते ३६ महिन्यांचे On Job Training (प्रात्यक्षिक प्रशिक्षण) देण्यात येते. तसेच महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी कायदा, २०१८ नुसार (संदर्भ क्र. २) शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) एकूण क्षमतेच्या कमाल २५ टक्के जागा भरू शकतात.

**२. शिकाऊ उमेदवारी योजनेचे प्रकार व त्यासाठी आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | शिकाऊ उमेदवारीचा प्रकार | आवश्यक अर्हता |
|---|---|---|
| १. | Trade Apprentice | Passed out of ITIs |
| २. | Fresher Trade Apprentice | Class 8th, 10th & 12th pass outs |
| ३. | Graduate Apprentice | Graduates in Engineering & Non-Engineering courses |
| ४. | Technician Apprentice | Passed out of Polytechnics |
| ५. | Technician (Vocational) Apprentice | Passed out of a 10+2 vocational training course |
| ६. | Apprentices who are perusing their graduation/diploma courses | |
| ७. | Apprentices who have passed out of any NSQF aligned Short term training Course including courses under the PMKVY/DDUGKY/MES | |
| ८. | Fresher apprentices amongst those who are class V pass & above who are not covered under any of the afore-mentioned categories but meet the Educational/Technical qualifications as specified in the course curriculum | |

३. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना कामाच्या मोबदल्यात शासनाच्या प्रचलित दरानुसार (संदर्भ क्र. ३) किमान विद्यावेतन देण्यात येते.

| अ.क्र. | प्रकार | विद्यावेतनाचा प्रतिमहा किमान दर |
|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते ९ वी उत्तीर्ण | रु.५,०००/- |
| २. | इयत्ता १० वी उत्तीर्ण | रु.६,०००/- |
| ३. | इयत्ता १२ वी उत्तीर्ण | रु.७,०००/- |
| ४. | राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्रधारक | रु.७,०००/- |
| ५. | तंत्रज्ञ (व्यावसायिक) | रु.७,०००/- |
| ६. | तंत्रज्ञ (पदविकाधारक) | रु.८,०००/- |
| ७. | पदवीधारक | रु.९,०००/- |

४. शिकाऊ उमेदवारीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात पहिल्या वर्षातील अनुज्ञेय विद्यावेतन दराच्या अनुक्रमे १०% आणि १५% वाढ अनुज्ञेय असते.

४.१ संदर्भ क्र. ३ मधील परिच्छेद ५ मधील (१ककक) नुसार राष्ट्रीय किंवा राज्य प्रमाणपत्र धारकाच्या बाबतीत, त्याने आधीच राष्ट्रीय परिषद किंवा राज्य परिषदेद्वारे मान्यताप्राप्त शाळा किंवा इतर संस्थेत घेतलेला प्रशिक्षण कालावधी असेल.

४.२ राष्ट्रीय अभ्यासक्रम प्रमाणपत्र धारक (आयटीआय) किंवा राज्य प्रमाणपत्र धारक असल्यास तो संदर्भ क्र. ३ नुसार परिच्छेद ५ मधील (१कक नुसार) शिकाऊ उमेदवार, प्रशिक्षणाच्या दुसऱ्या वर्षादरम्यान, त्याच्या विहित केलेल्या रक्कमेमध्ये १० टक्केची वृध्दी होईल आणि शिकाऊ उमेदवाराच्या तिसऱ्या वर्षादरम्यान विहित केलेल्या रक्कमेमध्ये १५ टक्केची वृध्दी होईल.

४.३ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये एक वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारास संदर्भ क्र. ३ नुसार विद्यावेतन रु. ७०००/- अनुज्ञेय असेल तर त्याला शिकाऊ उमेदवार म्हणून घेतांना ५ (१कक) नुसार तो प्रशिक्षणाच्या दुसऱ्या वर्षादरम्यान असेल तर त्याच्या विद्यावेतनात १० टक्के वाढ होऊन त्याला किमान ७७००/- विद्यावेतन देण्यात यावे.

४.४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दोन वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारास संदर्भ क्र. ३ नुसार विद्यावेतन रु. ७०००/- अनुज्ञेय असेल तर त्याला शिकाऊ उमेदवार म्हणून घेतांना ५ (१कक) नुसार तो प्रशिक्षणाच्या **तिसऱ्या** वर्षादरम्यान तर त्याच्या विद्यावेतनात १५ टक्के वाढ होऊन त्याला किमान ८०५०/- विद्यावेतन देण्यात यावे.

५. शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका व नगरपालिकेमध्ये आवश्यक प्रशासकीय व इतर अनुषंगीक कार्यांसाठी सेक्रेटरीअल असिस्टंट, कॉम्प्युटर ऑपरेटर अँण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट अभ्यासक्रमांचे उमेदवार लघुटंकलेखक व संगणकावरील टाईपरायटर (कॉम्प्युटर ऑपरेटर) या कामासाठी मोठया प्रमाणात कार्यालयांमध्ये पदे रिक्त असल्याने सदर योजना उपयोगी असणार आहे.

६. शिकाऊ उमेदवार (Apprenticeship) कार्यालयात नेमण्यासाठी नियोक्ता कार्यालयास शासकीय वृत्तपत्रामधून जाहिरात देऊन त्यामधून सदर उमेदवारांची निवड करता येईल अथवा जिल्ह्यांमधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील भरती मेळाव्यामध्ये उपस्थित असलेला प्रशिक्षणर्थ्यांमधून शिकाऊ उमेदवाराची निवड करणे शक्य आहे. तसेच www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावरुन शिकाऊ उमेदवाराची निवड करण्याकरीता आवश्यकतेनुसार विविध व्यवसायाच्या जागा स्थित केल्यास शिकाऊ उमेदवार संकेस्थळावरुन इच्छुकता दर्शविल्यास त्याप्रमाणे आपणास योग्य असलेल्या आपण निवड करु शकतो. याबाबतची कार्यपध्दती प्रपत्र - अ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

७. **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेंतर्गत "विद्यावेतन" संबंधित शिकाऊ उमेदवाराला विभागांतर्गत कार्यान्वित "३४-शिष्यवृत्ती व विद्यावेतन" या उद्दिष्टामधून देण्यात यावे. ज्या विभागाकडे सदर उद्दिष्ट उपलब्ध नाही त्या विभागांनी त्यांच्या विभागाच्या लेखाशिर्षांतर्गत सदर उद्दिष्ट घेण्याबाबत विहित**

**कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. सदर उद्दिष्ट कार्यान्वित होईपर्यंत यावर्षाअखेरपर्यंत (मार्च,२०२४) विभागांतर्गत उपलब्ध "१० कंत्राटी सेवा" या उद्दिष्टामधून सन २०२३-२४ या चालू वित्तीय वर्षाकरीता विद्यावेतनाचा खर्च भागविण्यात यावा.**

८. केंद्र शासनाने सुरु केलेल्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळामार्फत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी केली जाते. आस्थापनेची नोंदणी, प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी, विद्यावेतन अदा करणे व विद्यावेतन प्रतिपुर्ती इत्यादीबाबतची कार्यपध्दती संकेतस्थळावर विस्तृतपणे नमूद केलेली आहे. तसेच सुलभ संदर्भाकराकरीता निर्देशित व्यवसायांची यादी (Designated Trade List), विविध प्रकारच्या नोंदणी व प्रक्रिया कश्या प्रकारे असावी याबाबती माहिती पुस्तिका व व्हिडिओ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. **सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७/२०२३ दि. ०१.०९.२०२३ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.** परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०२१४१५१३३२७३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by AMEY ANIL GAWADE
Date: 2024.02.14 15:23:06 +05'30'

**( अमेय गावडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग (सर्व) मंत्रालय, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर
६. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)

७. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,

८. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,

९. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

१०. सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई

११. सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (सर्व) (संचालनालयामार्फत)

१२. निवड नस्ती. (व्यशि-३)

प्रपत्र - अ

शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेची कार्यपध्दती

↓

केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापनांची नोंदणी करणे (Registration)

↓

शिकाऊ उमेदवारीकरीता संबंधित प्रशासकीय विभागाने आवश्यकतेप्रमाणे व्यवसायानुरुप वृत्तपत्रामध्ये जाहीरात देवून प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणे/संकेतस्थळावरुन शिकाऊ उमेदवारीसाठी आवश्यकतेनुसार विविध व्यवसायाच्या जागा स्थित करणे/भरती मेळाव्यामध्ये उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांमधून प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणे

↓

आस्थापना व शिकाऊ उमेदवार यांच्यात संकेतस्थळामार्फत करार तयार करणे

↓

शिकाऊ उमेदवाराना विद्यावेतन देण्याकरीता ३४-शिष्यवृत्ती व विद्यावेतन हे नवीन उद्दिष्ट उपलब्ध नसल्यास नवीन तयार करुन त्यामार्फत प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन अदा करणे

↓

प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांची परिक्षा घेणे

↓

केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारांच्या परिक्षेचे मार्क्स अपलोड करणे

↓

शिकाऊ उमेदवाराना शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण प्रमाणपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होईल